# पोलीस अधीक्षक कार्यालय, चंद्रपूर

Email : sp.chandrapur@mahapolice.gov.in

☎ : 07172-264300, 📠: 07172-255800 ✍: 7447744100


## पोलीस वार्तापत्र

# चंद्रपूर जिल्हा पोलीस दलाची मोठी कारवाई

## हरविलेले ११८ मोबाईल शोधण्यास यश, १२ लाख ६३ हजार ९ २० रुपयांचा मुद्देमाल मूळ मालकांना परत

चंद्रपूर जिल्हा पोलीस दलाने तांत्रिक तपासाच्या आधारे मोठी कामगिरी केली असुन मागील वर्षभरात जिल्हयातून हरविलेले एकुण ११८ मोबाईल संच केंद्र सरकारच्या **CEIR (Central Equipment Identity Register)** पोर्टलचा तंत्रज्ञानाचा वापर करुन शोधुन काढले आहेत. या हस्तगत केलेल्या मोबाईलची एकुण अंदाजे किंमत १२,६३,९२०/- रुपये असुन हे सर्व मोबाईल एका विशेष कार्यक्रमात संबंधीत मूळ मालकांना सुपूर्द करण्यात आहे.

सदरचे शोधुन काढलेले मोबाईल मूळ मालकांना परत करण्यासाठी एका विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. मा.श्री संदीप पाटील, विशेष पोलीस महानिरीक्षक, नागपूर परिक्षेत्र, नागपूर यांच्या हस्ते मोबाईल धारकांना त्यांचे संच सुपूर्द करण्यात आले. आपला हरविलेला मोबाईल परत मिळाल्याने नागरिकांनी चंद्रपूर पोलीस दलाचे आभार मानले आहेत.

### ‘‘मोबाईल आजच्या काळातील एक अनिवार्य गरज’’

आजच्या आधुनिक युगात मोबाईल केवळ संवादाचे साधन राहिलेला नसून तो आपल्या जीवनाचा एक अविभाज्य भाग झाला आहे. चंद्रपूर पोलीसांनी मोबाईल परत करतांना, मोबाईलचे आजच्या जीवनातील महत्व अखोरेखित केले. मोबाईल हरवणे म्हणजे केवळ आर्थिक नुकसान नसुन त्या सोबत खालील गोष्टींचाही संपर्क तुटतो.

डिजीटल ओळख आणि बॅकिंग :- आज बहुतांश लोकांचे बॅक व्यवहार UPI (PhonePe, Google Pay) आणि महत्वाची कागदपत्रे मोबाईल Digi Locker मध्येच असतात. फोन हरवल्यास आर्थिक व्यवहारांना खीळ बसू शकते.

महत्वाचा डेटा आणि आठवणी :- मोबाईल मध्ये कुटूंबाचे फोटो, महत्वाचे व्हिडीओ आणि संपर्क क्रमांक Contacts साठविलेले असतात.जे परत मिळवणे कठीण असते.

शिक्षण आणि व्यवसाय: विद्यार्थी आणि व्यावसायिकांसाठी मोबाईल हे ज्ञानाचे आणि कामाचे मुख्य साधन आहे. अनेक छोटे व्यवसाय पूर्णपणे मोबाईलवरच अवलंबून आहेत.

सुरक्षितता :- आपत्कालीन परिस्थितीत मदतीसाठी संपर्क साधण्याचे मोबाईल हे सर्वात वेगवान साधन आहे.

### ‘‘पोलीस दलाची संवेदनशीलता’’

हे मान्य आहे की, मोबाईलची किंमत ५,१० हजार असो वा ५० हजार, त्यातील डेटा मालकाकासाठी अमूल्य असतो. याच संवेदनशीलते पोटी चंद्रपूर पोलीसांनी तांत्रिक कौशल्याचा वापर करुन नागरिकांच्या या गरजा पुन्हा त्यांच्या स्वाधीन केल्या आहेत.

**पोलीस केवळ एक वस्तु शोधत नसून, नागरिकांचे महत्वाचे डिजिटल आयुष्य सुरक्षित करत आहेत.**

# पोलीस अधीक्षक कार्यालय, चंद्रपूर

Email : sp.chandrapur@mahapolice.gov.in
☎ : 07172-264300, : 07172-255800 : 7447744100


## नागरिकांसाठी विशेष सूचना :- मोबाईल सुरक्षा आणि खबरदारी

चंद्रपूर पोलीस दलाचे वतीने मोबाईल चोरी किंवा हरवल्याच्या घटना रोखण्यासाठी नागरिकांना खालील आवाहन करण्यात येत आहे.

### मोबाईल खरेदी करतांना घ्यावयाची काळजी :-

- जुना (Second hand) मोबाईल खरेदी करतांना नेहमी त्याचे मूळ बिल तपासावे.
- बिलाशिवाय खरेदी केलेला मोबाईल चोरीचा असू शकतो, त्यामुळे वापरणारा व्यक्ती कायदेशीर अडचणीत येवू शकतो.
- हरवलेल्या किंवा चोरीचा मोबाईल संबंधीतांना किंवा नजीकचे पोस्टे ला जमा न करता स्वत: वापरणे कलम ३१४ भारतीय न्याय संहिता-२०२३ अन्वये कायदेशीर गुन्हा असुन त्यासाठी ६ महिने ते २ वर्षापर्यंत तुरुंगवास व दंडाची तरतुद आहे.
- आपल्या मोबाईल चा IMEI चा क्रमांक नोंदवून ठेवा.
- प्रत्येक मोबाईलचा IMEI (International Mobile Equipment Identity) क्रमांक वेगळा असतो. आपल्या मोबाईलचा क्रमांक जाणून घेण्यासाठी *#06# हा कोड डायल करा आणि तो क्रमांक डायरीत लिहून ठेवा.

### मोबाईल हरवल्यास काय करावे? Step-by-Step :-

१) सर्वात आधी नजिकच्या पोलीस स्टेशन ला मोबाईल हरवल्याची तक्रार नोंदवावे.

२) हरवलेल्या मोबाईल मधील असलेले सिम कार्ड त्वरीत ब्लॉक करा.

३) त्याच क्रमांकाचा नविन सिम कार्ड त्वरीत घ्यावे.

४) नविन सिमकार्ड वरील SMS सेवा सर्विस सुरु झाल्यावर (२४ तासात) भारत सरकारच्या ceir.gov.in या संकेतस्थळावर जाऊन आपला मोबाईल ब्लॉक करा. यामुळे तो मोबाईल कोणालाही वापरता येणार नाही.

### वैयक्तिक डेटाची सुरक्षा :-

मोबाईल मध्ये नेहमी Strong Password, Pattern किंवा बायोमेट्रिक लॉक ठेवा.

गुगल ड्रायव्ह (Google Drive) किंवा आयक्लाउड (iCloud) वर आपल्या डेटाचा बॅकअप नियमितपणे घ्या. जेणे करुन फोन हरवल्यास माहिती सुरक्षित राहील.

## तुमचा सतर्कपणा हाच मोबाईल चोरीला आळा घालण्याचा प्रभावी मार्ग आहे.